www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide

Test Booklet Code & Serial No.
प्रश्नपत्रिका कोड व क्रमांक

**Paper-I**

**A**

**Signature and Name of Invigilator**

1. (Signature) ..........................................

(Name) ..........................................

2. (Signature) ..........................................

(Name) ..........................................

Seat No. | | | | | | |

(In figures as in Admit Card)

Seat No. ..........................................................

(In words)

OMR Sheet No. | | | | | | |

(To be filled by the Candidate)

# JUN - 00119

**Time Allowed : 1 Hour]** **[Maximum Marks : 100**

Number of Pages in this Booklet : **24** Number of Questions in this Booklet : **50**

## Instructions for the Candidates

1. Write your Seat No. and OMR Sheet No. in the space provided on the top of this page.
2. This paper consists of **Fifty (50)** multiple-choice type of questions. Each question will carry **two** marks. *All* questions of Paper I will be compulsory.
3. At the commencement of examination, the question booklet will be given to the student. In the first 5 minutes, you are requested to open the booklet and compulsorily examine it as follows :
   - (*i*) To have access to the Question Booklet, tear off the paper seal on the edge of this cover page. Do not accept a booklet without sticker-seal or open booklet.
   - (*ii*) Tally the number of pages and number of questions in the booklet with the information printed on the cover page. Faulty booklets due to any other or any other discrepancy should not be accepted and correct booklet should be obtained from the invigilator within the period of 5 minutes. Afterwards, neither the Question Booklet will be replaced nor any extra time will be given. The same may please be noted.
   - (*iii*) After this verification is over, the OMR Sheet Number should be entered on this Test Booklet.
4. Each question has four alternative responses marked (A), (B), (C) and (D). You have to darken the circle as indicated below on the correct response against each item.
   **Example :** where (C) is the correct response.
   (A) (B) ● (D)
5. Your responses to the items are to be indicated in the **OMR Sheet given inside the Booklet only.** If you mark at any place other than in the circle in the OMR Sheet, it will not be evaluated.
6. Read instructions given inside carefully.
7. Rough Work is to be done at the end of this booklet.
8. If you write your Name, Seat Number, Phone Number or put any mark on any part of the OMR Sheet, Except for the space allotted for the relevant entries, which may disclose your identity, or use abusive language or employ any other unfair means, you will render yourself liable to disqualification.
9. You have to return original OMR Sheet to the invigilator at the end of the examination compulsorily and must not carry it with you outside the Examination Hall. You are, however, allowed to carry the Test Booklet and duplicate copy of OMR Sheet on conclusion of examination.
10. Use only Blue/Black Ball point pen.
11. Use of any calculator or log table, etc., is prohibited.
12. There is no negative marking for incorrect answers.

## विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाच्या सूचना

1. परिक्षार्थींनी आपला आसन क्रमांक या पृष्ठावरील वरच्या कोपऱ्यात लिहावा. तसेच आपणांस दिलेल्या उत्तरपत्रिकेचा क्रमांक त्याखाली लिहावा.
2. या प्रश्नपत्रिकेत **पन्नास** (50) बहुनिवड प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नास **दोन** गुण आहेत. या प्रश्नपत्रिकेतील **सर्व** प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे.
3. परीक्षा सुरू झाल्यावर विद्यार्थ्याला प्रश्नपत्रिका दिली जाईल. सुरुवातीच्या 5 मिनीटांमध्ये आपण सदर प्रश्नपत्रिका उघडून खालील बाबी अवश्य तपासून पहाव्यात.
   - (*i*) प्रश्नपत्रिका उघडण्यासाठी प्रश्नपत्रिकेवर लावलेले सील उघडावे. सील नसलेली किंवा सील उघडलेली प्रश्नपत्रिका स्विकारू नये.
   - (*ii*) पहिल्या पृष्ठावर नमूद केल्याप्रमाणे प्रश्नपत्रिकेची एकूण पृष्ठे तसेच प्रश्नपत्रिकेतील एकूण प्रश्नांची संख्या पडताळून पहावी. पृष्ठे कमी असलेली सदोष प्रश्नपत्रिका सुरुवातीच्या 5 मिनिटातच पर्यवेक्षकाला परत देऊन दुसरी प्रश्नपत्रिका मागवून घ्यावी. त्यानंतर प्रश्नपत्रिका बदलून मिळणार नाही. तसेच वेळही वाढवून मिळणार नाही याची कृपया विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.
   - (*iii*) वरीलप्रमाणे सर्व पडताळून पाहिल्यानंतरच प्रश्नपत्रिकेवर ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेचा नंबर लिहावा.
4. प्रत्येक प्रश्नासाठी (A), (B), (C) आणि (D) अशी चार विकल्प उत्तरे दिली आहेत. त्यातील योग्य उत्तराचा रकाना खाली दर्शविल्याप्रमाणे ठळकपणे काळा/निळा करावा.
   **उदा.** : जर (C) हे योग्य उत्तर असेल तर.
   (A) (B) ● (D)
5. या प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांची उत्तरे **ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेतच दर्शवावीत.** इतर ठिकाणी लिहिलेली उत्तरे तपासली जाणार नाहीत.
6. आत दिलेल्या सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात.
7. प्रश्नपत्रिकेच्या शेवटी जोडलेल्या कोऱ्या पानावरच कच्चे काम करावे.
8. जर आपण ओ.एम.आर. वर नमूद केलेल्या ठिकाणा व्यतिरीक्त इतर कोठेही नाव, आसन क्रमांक, फोन नंबर किंवा ओळख पटेल अशी कोणतीही खूण केलेली आढळून आल्यास अथवा असभ्य भाषेचा वापर किंवा इतर गैरमार्गांचा अवलंब केल्यास विद्यार्थ्याला परीक्षेस अपात्र ठरविण्यात येईल.
9. परीक्षा संपल्यानंतर विद्यार्थ्याने मूळ ओ.एम.आर. उत्तरपत्रिका पर्यवेक्षकांकडे परत करणे आवश्यक आहे. तथापि, प्रश्नपत्रिका व ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेची द्वितीय प्रत आपल्याबरोबर नेण्यास विद्यार्थ्यांना परवानगी आहे.
10. फक्त निळ्या किंवा काळ्या बॉल पेनचाच वापर करावा.
11. कॅलक्युलेटर किंवा लॉग टेबल वापरण्यास परवानगी नाही.
12. चुकीच्या उत्तरासाठी गुण कपात केली जाणार नाही.

Your Personal Exams Guide

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



prepp
Your Personal Exam Guide

www.prepp.in



# Paper I
# प्रश्नपत्रिका I

**Time Allowed : 60 Minutes]** **[Maximum Marks : 100**

**Note :** This Paper contains **Fifty (50)** multiple choice questions, each question carrying **Two (2)** marks. Attempt *All* questions.

**सूचना :** या प्रश्नपत्रिकेत **पन्नास (50)** बहुनिवड प्रश्न दिलेले असून प्रत्येक प्रश्नाला **दोन (2)** गुण आहेत. **सर्व** प्रश्न सोडवा.

1. The reflective level teaching is :

(A) teacher-centered and subject-centered but not learner-centered

(B) not teacher-centered but is subject-centered and learner-centered

(C) teacher-centered and not subject-centered and learner-centered

(D) neither teacher-centered nor subject-centered but is learner-centered

2. The adult learner is :

(A) peer-motivated

(B) self-motivated

(C) family-motivated

(D) society-motivated

1. विमर्शी स्तरावरील अध्यापन :

(A) शिक्षककेंद्री आणि विषयकेंद्री असते मात्र अध्ययनार्थीकेंद्री नसते.

(B) शिक्षककेंद्री नसते मात्र विषयकेंद्री आणि अध्ययनार्थीकेंद्री असते.

(C) शिक्षककेंद्री असते मात्र विषयकेंद्री आणि अध्ययनार्थीकेंद्री नसते.

(D) शिक्षककेंद्री नसते तसेच विषयकेंद्री नसते मात्र अध्ययनार्थीकेंद्री असते.

2. प्रौढ अध्ययनार्थी :

(A) सहाध्यायी–प्रेरित असतो

(B) स्वयंप्रेरित असतो

(C) कुटुंब–प्रेरित असतो

(D) समाजप्रेरित असतो

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



3. Massive Open Online Courses (MOOCs) are :

(A) flexible and open form of self-directed, online learning designed for mass participation

(B) flexible and open form of teacher-directed, online learning designed for mass participation

(C) flexible and open form of self-directed, off-line learning designed for mass participation

(D) flexible and open form of teacher-directed, off-line learning designed for mass participation

4. Modern teaching support system includes :

(A) Smart Boards

(B) Green Boards

(C) Charts

(D) Maps

3. मासिव्ह ओपन ऑनलाईन कोर्सेस् (MOOCs) म्हणजे .............................. होय.

(A) मोठ्या प्रमाणावरील (Mass) सहभागासाठी आरेखित केलेले, लवचिक आणि स्वनिर्देशीत, मुक्त स्वरूपाचे ऑनलाईन अध्ययन

(B) मोठ्या प्रमाणावरील (Mass) सहभागासाठी आरेखित केलेले, लवचिक आणि शिक्षक-निर्देशीत, मुक्त स्वरूपाचे ऑनलाईन अध्ययन

(C) मोठ्या प्रमाणावरील (Mass) सहभागासाठी आरेखित केलेले, लवचिक आणि स्वनिर्देशीत, मुक्त स्वरूपाचे ऑफलाईन अध्ययन

(D) मोठ्या प्रमाणावरील (Mass) सहभागासाठी आरेखित केलेले, लवचिक आणि शिक्षक-निर्देशीत, मुक्त स्वरूपाचे ऑफलाईन अध्ययन

4. अध्यापनाच्या आधुनिक साहाय्यभूत प्रणालीमध्ये .............................. चा समावेश होतो.

(A) स्मार्ट बोर्डस्

(B) ग्रीन बोर्डस्

(C) तक्ते

(D) नकाशे

www.prepp.in
Prepp
Your Personal Exams Guide



5. Which of the following is *not* applicable to the internal assessment ?

(A) Integration of teaching and evaluation

(B) Testing of skills and abilities

(C) Periodic and continuous

(D) Use of only achievement tests

6. Dialogue method of discovering the truth was given by :

(A) Plato

(B) Socrates

(C) Froebel

(D) Herbart

7. If one variable is measured on nominal scale and other variable is measured on interval scale, the appropriate research method will be :

(A) Experimental method

(B) Case-study method

(C) Cross-sectional method

(D) Correlation method

5. अंतर्गत मूल्यमापनाला, खालीलपैकी काय लागू पडत **नाही** ?

(A) अध्यापन आणि मूल्यमापन यांचे एकात्मीकरण

(B) कौशल्ये आणि क्षमता यांची तपासणी

(C) समयकालिक (periodic) आणि निरंतर (continuous)

(D) केवळ संपादन चाचण्यांचा उपयोग

6. सत्यशोधनासाठीची संवादपद्धती .................. यांनी दिली.

(A) प्लेटो

(B) सॉक्रेटीस

(C) फ्रोबेल

(D) हरबार्ट

7. जर एक चल नामांकन श्रेणीवर (nominal scale) मोजले जात असेल आणि दुसरे चल आंतरश्रेणीवर (interval scale) मोजले जात असेल, तर योग्य संशोधनपद्धती ................ ही असेल.

(A) प्रायोगिक पद्धती

(B) व्यक्ती-अभ्यास पद्धती

(C) तिर्यक-छेदात्मक पद्धती

(D) सहसंबंध पद्धती

www.prepp.in



8. Which of the following is *not* a characteristic of good hypothesis ?
   (A) Testability
   (B) Objectivity
   (C) Complexity
   (D) Conceptual clarity

9. If mean and median of a frequency distribution are 20 and 22 respectively, then the mode of the distribution will be :
   (A) 21
   (B) 16
   (C) 26
   (D) 11

10. Using someone else's research without due acknowledgement is called as :
   (A) Copyright
   (B) Plagiarism
   (C) Publication
   (D) Patent

8. खालीलपैकी कोणते चांगल्या परिकल्पनेचे (hypothesis) वैशिष्ट्य **नाही** ?
   (A) तपासणीक्षमता
   (B) वस्तुनिष्ठता
   (C) गुंतागुंत
   (D) संबोधस्पष्टता

9. जर वारंवारिता वितरणाचे मध्यमान आणि मध्यांक अनुक्रमे 20 व 22 असतील, तर त्या वितरणाचे बहुलक .............................. असेल.
   (A) 21
   (B) 16
   (C) 26
   (D) 11

10. दुसऱ्याचे संशोधन आवश्यक ते श्रेय न देता वापरणे, यास .............................. म्हणतात.
   (A) कॉपीराईट
   (B) वाङ्मयचौर्य
   (C) प्रकाशन
   (D) स्वामित्व हक्क

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



**Directions :**

**Answer Question Nos. 11 to 15 based on either the English passage or the Marathi passage :**

A sanctuary may be defined as a place where Man is passive and the rest of Nature active. Till quite recently, let me tell you, Nature had her own sanctuaries, where man either did not go at all or only as a tool-using animal in comparatively small numbers. But now, in this machinery age, there is no place left where man cannot go with overwhelming forces at his command. He can strangle to death all the nobler wildlife in the world to-day. To-morrow he certainly will have done so, unless he exercises due foresight and self-control in the mean time.

There is not the slightest doubt that birds and mammals are now being killed off much faster than they can breed. And it is always the largest and noblest forms of life that suffer most. The whales and elephants, lions and eagles, go. The rats and

**सूचना :**

**प्रश्न क्रमांक 11 ते 15 हे पुढे दिलेल्या उताऱ्यावर आधारित आहेत. इंग्रजीतील किंवा मराठीतील उताऱ्यावरील प्रश्नांची उत्तरे द्या :**

भारतीय माणसाची एक विशिष्ट मनोवृत्ती आहे. गेल्या पाच हजार वर्षांच्या परंपरेतून ती सिद्ध झालेली आहे. कोणत्याही एका पंथाबद्दल, विचाराबद्दल, आचरणाबद्दल भारतीय माणूस टोकाचा आग्रही नसतो. एका शब्दात सांगायचे तर भारतीय माणूस अनाग्रही आहे. 'अनाग्रही' असणे चांगले की वाईट, हा खरा प्रश्न नाही. खरा प्रश्न आधी येथील समाजाचे हे स्वरूप नीट समजून घेण्याचा आहे. म्हणूनच या समाजाला एकात्म करताना येथील विचारवंतांनी 'विविधतेत एकता' अशी घोषणा दिली. यात प्रत्येक समाजाची स्वायत्तता टिकून राहते, प्रत्येक समाजाची अहंता सुखावते आणि आपण एक असल्याची जाणीव हळूहळू रुजवता येते. दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर भारत हे कधीच एक राष्ट्र

www.prepp.in

prepp
Your Personal Exams Guide



flies, and all mean parasites, remain. This is inevitable in certain cases. But it is wanton killing off that I am speaking of to-night. Civilized man begins by destroying the very forms of wildlife he learns to appreciate most when he becomes still more civilized. The obvious remedy is to begin conservation at an earlier stage, when it is easier and better in every way, by enforcing laws for close seasons, game preserves, the selective protection of certain species, and sanctuaries.

I have just defined a sanctuary as a place where man is passive and the rest of Nature active. But this general definition is too absolute for any special case. The mere fact that man has to protect a sanctuary does away with his purely passive attitude. Then, he can be beneficially active by destroying pests and parasites, like bot-flies or mosquitoes, and by finding antidotes for diseases like the epidemic which periodically kills off the rabbits and thus starves many of the carnivores to death.

नव्हते. इथे जातीजातींचे स्वायत्त गट होते. या स्वायत्त गटांनी धर्म-पंथांचे वस्त्र चढवून पुन्हा आपले वेगळेपण टिकवले होते. भाषेच्या सीमारेषांनी पुन्हा आपापले वेगळेपण राखले होते. अशा आपल्या समाजाने गेल्या दीडशे वर्षांत एक नवे वळण घेतले आहे. जातीची स्वायत्तता प्रादेशिक स्वायत्ततेत विलीन करण्यास आज आपला समाज मानसिकदृष्ट्या तयार झाला आहे. ही प्रादेशिक स्वायत्तता कायम ठेवून राष्ट्रीय ऐक्य निर्माण व्हावे, या ध्येयवादास इथल्या समाजाने मान्यता दिलेली आहे. आणि हा सर्व गेल्या शे-दीडशे वर्षांतल्या अनेक चळवळींचा एक अंतिम परिणाम आहे. एका फार मोठ्या संक्रमणातून भारतीय समाजाची वाटचाल चालू आहे. अशा या वाटचालीचा अभ्यास करण्याचे अत्यंत महत्त्वाचे साधन वाङ्मय असते. वाङ्मय ही मनुष्यनिर्मित कला आहे. अत्यंत परिचित आणि सहज उपलब्ध असलेल्या भाषेच्या साधनातून ती प्रकट होते. भाषेत मृत संस्कृतीचे जसे अनेक अवशेष असतात, तसे समाजाच्या बदलत्या स्थिती–

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



But, except in cases where experiment has proved his intervention to be beneficial, the less he upsets the balance of Nature the better, even when he tries to be an earthly Providence.

11. In the passage, it is implied by the author that his first definition of a 'Sanctuary' is :

(A) somewhat idealistic

(B) quite wrong

(C) completely unacceptable

(D) difficult to defend

12. The author seems to be much concerned about the active role of man in protection of animals because :

(A) he is afraid of the fact that it would lead to the imbalance of the ecological system

(B) he is sure that it is beneficial for the mankind itself

(C) he thinks that man's passiveness is not a sign of his being alive

(D) he is more idealistic

गतीचेही तरंग असतात. म्हणून वाङ्मय ही कला जशी संस्कृतीची फलश्रुती आहे तशीच संस्कृतीच्या अभ्यासाचेही ते फार मोठे साधन आहे. वाङ्मयाचा व्यवहार ते ज्या संस्कृतीत निर्माण होते, त्या संस्कृतीच्या आकलनाशिवाय कळणेच शक्य नाही.

11. भारतीय माणूस अनाग्रही आहे, कारण :

(A) त्याची सर्वसमावेशकता

(B) त्याची भावनात्मकता

(C) त्याची संघटनशीलता

(D) त्याचा बुद्धिप्रामाण्यवाद

12. भारतीय समाजव्यवस्था ही वैविध्यपूर्ण आहे; तशी ती अंतर्गत येणाऱ्या प्रत्येक समाजघटकाला त्याचे वैचारिक स्वातंत्र्य देणारीही आहे :

(A) संपूर्ण विधान बरोबर

(B) संपूर्ण विधान चूक

(C) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

(D) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर

www.prepp.in
Prepp Your Personal Exams Guide



13. The above passage can be :
    (A) a part of an article in a scientific journal
    (B) an argument in front of the court of law
    (C) a part of a speech delivered to an educated audience
    (D) an extract of a scientific report
14. The author intends to convey the message that :
    (A) Man is quite a clever animal
    (B) If the man failed to maintain the ecological balance, it will be harmful in the long-run
    (C) Man wishes to destroy the wild-life as it is harmful for his existence
    (D) The balanced ecosystem will decrease the importance of man in the overall affairs of the universe
15. The tone of the author can be best described as being :
    (A) descriptive
    (B) humorous
    (C) narrative
    (D) sarcastic
16. According to Dr. Deval, communication means :
    (A) Sharing of ideas
    (B) Sharing of experiences
    (C) Perception
    (D) Sharing of emotions

13. भारत हे कधीच एक राष्ट्र नव्हते; कारण :
    (A) धर्मपंथांचा आंधळेपणा
    (B) सामाजिक अहंकार
    (C) जातीजातील स्वायत्तता
    (D) भाषिक समानता
14. जातीय स्वायत्तता आणि प्रादेशिक स्वायत्तता या दोन बाबी स्वतंत्र असून; त्या दोन्ही एकत्र आल्यास राष्ट्रीय ऐक्याची भावना वाढीस लागेल.
    (A) संपूर्ण विधान चूक
    (B) संपूर्ण विधान बरोबर
    (C) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक
    (D) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर
15. वाङ्मयाच्या अभिव्यक्तीचे माध्यम कोणते ?
    (A) समाज
    (B) मनुष्य
    (C) संस्कृती
    (D) भाषा
16. डॉ. देवल यांच्या मते, संप्रेषण म्हणजे :
    (A) कल्पनांचे सामायिकीकरण
    (B) अनुभवांचे सामायिकीकरण
    (C) अवबोधन
    (D) भावनांचे सामायिकीकरण

17. To select media to teach a lesson to class, teacher should consider objectives of the lesson, age group of students, knowledge about media to be used and :
    (A) teaching methods
    (B) teaching aids
    (C) mass media
    (D) evaluation system

18. Traffic signals are example of .................... communication.
    (A) mass
    (B) non-verbal
    (C) verbal
    (D) one to many

19. Customers coming to mall and sharing some common interest and group based activities are steadily increasing. This is the example of ........................ group.
    (A) open
    (B) closed
    (C) peer to peer
    (D) hierarchical

20. Sometimes mass media misleads society because receivers are :
    (A) heterogenous
    (B) in large numbers
    (C) illiterate
    (D) critical

17. वर्गात पाठ शिकविण्यासाठी माध्यमाची निवड करताना शिक्षकाने पाठाची उद्दिष्टे, विद्यार्थ्यांचा वयोगट, वापरल्या जाणाऱ्या माध्यमाविषयीचे ज्ञान व .............................. लक्षात घेतले पाहिजे.
    (A) अध्यापनपद्धती
    (B) शैक्षणिक साधने
    (C) समूह माध्यम
    (D) मूल्यमापन व्यवस्था

18. ट्रॅफिक सिग्नलस् हे .............................. संप्रेषणाचे उदाहरण होय.
    (A) समूह
    (B) अशाब्दिक
    (C) शाब्दिक
    (D) एकाकडून-अनेक

19. एखाद्या मॉलमध्ये गिऱ्हाईके येतात ते आपल्या सामाईक हिताच्या बाबींची एकमेकांमध्ये देवाणघेवाण करतात व त्या समूहाच्या कृती स्थिरपणे वृद्धिंगत होत जातात. हे ............... समूहाचे उदाहरण होय.
    (A) मुक्त
    (B) बद्ध
    (C) सहकारी-सहकारी
    (D) श्रेणीबद्ध

20. काहीवेळा समूह माध्यमे समाजाला चुकीच्या मार्गाला लावतात कारण येथे ग्राहक .......... असतात.
    (A) बहुजिनसी (heterogenous)
    (B) असंख्य
    (C) निरक्षर
    (D) चिकित्सक

www.prepp.in



21. In a game with two players X and Y and given $n$ ($\geq 4$) number of circles drawn on a plane paper, alternately each one of X and Y is suppose to join two different circles which were not already joined by a line. The winner is one who joins the last available pair of circles and the game ends. If X starts the game then :

(A) X always wins

(B) Y always wins

(C) X wins whenever $n$ is odd

(D) Y wins whenever $n$ is a power of 2

22. In a classroom there are ten chairs in a row $c_1, c_2, c_3, ........., c_{10}$ which are labelled by numbers 1, 2, 3, ........., 10 arbitrarily but satisfying the condition that $k_i \leq k_j$ whenever $i \leq j$, where $k_1, k_2, k_3, ........., k_{10}$ are the labels given to the chairs $c_1, c_2, c_3, ........., c_{10}$ respectively. Then which of the following is *true* ?

(A) For some $i$, $k_i = i$

(B) There are two $i$ and $j$ such that $k_i = i$ and $k_j = j$

(C) All labels must be distinct

(D) For every $i$, $k_i = i$

21. एका खेळामध्ये X व Y हे दोन खेळाडू आहेत व एका कागदावर $n$ ($\geq 4$) वर्तुळे रेखाटली आहेत; X आणि Y हे एकानंतर एकाने अगोदर न जोडलेल्या दोन वर्तुळांना रेषाखंडाने जोडतात. जो शेवटची वर्तुळजोडी जोडतो तो जिंकतो व खेळ संपतो. जर X ने खेळाची सुरुवात केली, तर :

(A) X नेहमी जिंकणार

(B) Y नेहमी जिंकणार

(C) $n$ विषम असेल तर X जिंकणार

(D) $n$ ही संख्या दोनाच्या घातांक स्वरूपात असेल तर Y जिंकणार

22. एका वर्गातील रांगेत असलेल्या दहा खुर्च्या $c_1, c_2, c_3, ......., c_{10}$ ना 1, 2, 3, ......, 10 या संख्यांनी नामांकित केलेले आहे क्रमशः $k_1, k_2, k_3, ........., k_{10}$ हे नामांकन $c_1, c_2, c_3, ........., c_{10}$ खुर्च्यांना दिलेले आहे ते $k_i \leq k_j$ जेंव्हा $i \leq j$ ही अट पाळतात. तर पुढीलपैकी कोणते विधान **सत्य** आहे ?

(A) काही $i$ साठी, $k_i = i$

(B) दोन $i$ व $j$ साठी $k_i = i$ व $k_j = j$

(C) सर्व नामांकन वेगवेगळे आहे

(D) प्रत्येक $i$ साठी, $k_i = i$

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



23. There are flowers in a basket which are to be distributed to five persons standing in a row. The second person received half of the number of flowers given to the first person, the third person received half of the number of flowers received to the second person; the fourth person received half of the number of flowers received to the third person and the fifth person received half of the number of flowers received to the fourth person. If the fifth person received only one flower and there is no flower remaining in the basket, how many flowers were their in the basket ?

(A) 31

(B) 32

(C) 16

(D) 15

24. If 6 men or 8 children complete one task in 24 days, then how many days will be required to complete the task for 7 men and 12 children ?

(A) 12

(B) 9

(C) 10

(D) 16

23. एका टोपलीत असलेली सर्व फुळे रांगेत उभ्या असलेल्या पाच व्यक्तींना पुढील प्रमाणे वाटली. दुसऱ्या व्यक्तीस पहिल्या व्यक्तीच्या निम्मी फुले, तिसऱ्या व्यक्तीस दुसऱ्यापेक्षा निम्मी फुले, चौथ्या व्यक्तीस तिसऱ्यापेक्षा निम्मी फुले व पाचव्या व्यक्तीस चौथ्या व्यक्तीपेक्षा निम्मी फुले दिली. जर पाचव्या व्यक्तीस एक फूल मिळाले, तर टोपलीतील एकूण फुले किती ?

(A) 31

(B) 32

(C) 16

(D) 15

24. एक काम 6 पुरुष किंवा 8 मुले 24 दिवसात पूर्ण करतात तर तेच काम 7 पुरुष आणि 12 मुले मिळून किती दिवसांत पूर्ण करतील ?

(A) 12

(B) 9

(C) 10

(D) 16

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



25. The area of a parallelogram is 128 $cm^2$ and its altitude is twice the corresponding base. What is the length of the base ?

(A) 6 cm

(B) 7 cm

(C) 12 cm

(D) 8 cm

26. Arrange the following terms in a meaningful-logical order indicating the *correct* sequence :

(1) Grass

(2) Curd

(3) Milk

(4) Cow

(5) Butter

(A) 1—4—3—2—5

(B) 4—3—2—1—5

(C) 5—2—3—4—1

(D) 4—1—3—2—5

27. If the term HJLN is converted into ILOR, then by the same principle what could be the correct alternative for the term DFHJ ?

(A) FHJN

(B) EHKN

(C) EGIL

(D) FHJN

25. एका समांतरभुज चौकोनाचे क्षेत्रफळ 128 $cm^2$ आहे व त्याची उंची संबंधित पायापेक्षा दुप्पट आहे, तर त्या पायाची लांबी किती ?

(A) 6 cm

(B) 7 cm

(C) 12 cm

(D) 8 cm

26. खाली दिलेल्या संकल्पना अर्थपूर्ण व तार्किक पद्धतीने मांडून योग्य क्रम कोणता ते शोधा :

(1) गवत

(2) दही

(3) दूध

(4) गाय

(5) लोणी

(A) 1—4—3—2—5

(B) 4—3—2—1—5

(C) 5—2—3—4—1

(D) 4—1—3—2—5

27. जर HJLN याचे रूपांतर ILOR असे होत असेल, तर त्याच तत्त्वाने DFHJ यासाठी कोणता पर्याय बरोबर असेल ?

(A) FHJN

(B) EHKN

(C) EGIL

(D) FHJN

www.prepp.in
Prepp Your Personal Exams Guide



28. 'Parrots have green colour.' This statement is a/an :

(A) Perception

(B) Inference

(C) Comparison

(D) Implication

29. Which of the following is/are the valid conclusions based on the statements given below ?

**Statement I :**

All donkeys are hardworking.

**Statement II :**

Some hardworking animals are human beings.

**Conclusion 1 :**

Some donkeys are hardworking.

**Conclusion 2 :**

Some donkeys are human beings.

(A) 1 only

(B) 2 only

(C) 1 and 2 both

(D) Neither 1 nor 2

28. 'पोपटांचा रंग हिरवा आहे.' हे विधान ....... प्रमाणाचे आहे.

(A) प्रत्यक्ष

(B) अनुमान

(C) उपमान

(D) अर्थापत्ती

29. खाली दिलेल्या विधानावर आधारित कोणते निष्कर्ष उचित आहेत ?

**विधान I :**

सर्व गाढव कष्टाळू आहेत.

**विधान II :**

काही कष्टाळू प्राणी मानव आहेत.

**निष्कर्ष 1 :**

काही गाढव कष्टाळू आहेत.

**निष्कर्ष 2 :**

काही गाढव मानव आहेत.

(A) 1 फक्त

(B) 2 फक्त

(C) 1 आणि 2 दोन्ही

(D) 1 नाही 2 पण नाही




Prepp Your Personal Exam Guide

www.prepp.in
Prepp
Your Personal Exams Guide





30. Which of the following diagrams shows the correct relationship among :

Boys, Students, Girls

(A) 


(B) 

(C) 


(D) 


30. खालीलपैकी कोणती आकृती तीन संकल्पनांमधील संबंध बरोबर दर्शविते ?

मुले, विद्यार्थी, मुली

(A) 

(B) 

(C) 

(D) 

Prepp
Your Personal Exam Guide

31. A report regarding certain examination is given below :

Total number of candidates appeared = 1000

The number of male candidates = 550

The number of candidates passed = 700

The number of successful male candidates will lie between the limits ........................ .

(A) 100 to 250

(B) 250 to 550

(C) 550 to 700

(D) 700 to 1000

**Direction :**

**Question numbers 32 and 33 are based on the following information :**

| State | Total number of male & female employees | Ratio of number of males to that of female employees | Percentage of post-graduate among total employees |
|---|---|---|---|
| A | 20,000 | 13 : 7 | 60 |
| B | 30,000 | 8 : 7 | 50 |
| C | 25,000 | 5 : 5 | 64 |
| D | 40,000 | 14 : 6 | 72 |
| E | 10,000 | 6 : 4 | 42 |

31. एका परीक्षेबाबतचा अहवाल पुढे दिलेला आहे :

परीक्षेसाठी बसलेले एकूण उमेदवार = 1000

पुरुष उमेदवार = 550

पास झालेले उमेदवार = 700

पास झालेल्या पुरुषांची संख्या .................. या मर्यादांमध्ये असेल.

(A) 100 ते 250

(B) 250 ते 550

(C) 550 ते 700

(D) 700 ते 1000

**सूचना :**

**प्रश्न क्रमांक 32 आणि 33 हे पुढील माहितीवर आधारित आहेत :**

| राज्य | स्त्री व पुरुष एकूण नोकरदारांची संख्या | पुरुष नोकरदारांचे स्त्री नोकरदारांशी गुणोत्तर | एकूण नोकरदारांपैकी पदव्युत्तर नोकरदारांची शेकडेवारी |
|---|---|---|---|
| A | 20,000 | 13 : 7 | 60 |
| B | 30,000 | 8 : 7 | 50 |
| C | 25,000 | 5 : 5 | 64 |
| D | 40,000 | 14 : 6 | 72 |
| E | 10,000 | 6 : 4 | 42 |

www.prepp.in
Prepp
Your Personal Exams Guide



32. Find the number of male employees in state D :

(A) 14,000

(B) 6,000

(C) 28,000

(D) 20,000

33. Find the number of post-graduate female employees in state B :

(A) 8,000


(B) 15,000

(C) 350

(D) 7,000

**Direction :**

**Question numbers 34 and 35 are based on the following pie-diagram :**




A : Printing cost

B : Cost of paper

C : Royalty

D : Advertisement charges

E : Other charges

32. D या राज्यातील पुरुष नोकरदारांची संख्या काढा :

(A) 14,000

(B) 6,000

(C) 28,000

(D) 20,000

33. पदव्युत्तर स्त्री नोकरदारांची B राज्यामधील संख्या काढा :

(A) 8,000


(B) 15,000

(C) 350

(D) 7,000

**सूचना :**

**प्रश्न क्रमांक 34 आणि 35 हे पुढील वर्तुळ-आकृतीवर आधारित आहेत :**




A : छपाई खर्च

B : कागदाचा खर्च

C : मानधन

D : जाहिरात खर्च

E : अन्य खर्च

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



34. If the cost of paper is Rs. 16,000, then find the amount of other charges :

(A) Rs. 16,000

(B) Rs. 10,000

(C) Rs. 8,000

(D) Rs. 12,000

35. The tax deducted at source is 10% of the royalty amount then the amount of tax paid is ............... .

(A) Rs. 1,200

(B) Rs. 800

(C) Rs. 1,000

(D) Rs. 8,000

36. Which of the following is the *correct* full form of IPTV ?

(A) International and Political Television

(B) Internet Proliferation Television

(C) Inter Provisional Television

(D) Internet Protocol Television

34. जर कागदाचा खर्च 16,000 रु. असेल, तर अन्य खर्चाची रक्कम काढा :

(A) 16,000 रु.

(B) 10,000 रु.

(C) 8,000 रु.

(D) 12,000 रु.

35. मानधनाच्या रकमेवर 10% दराने कर कापल्यास कराची रक्कम ...................... आहे.

(A) 1,200 रु.

(B) 800 रु.

(C) 1,000 रु.

(D) 8,000 रु.

36. IPTV या शब्दाचा **योग्य** आद्याक्षर विस्तार पुढीलपैकी कोणता ?

(A) इंटरनॅशनल अँड पोलिटिकल टेलिव्हिजन

(B) इंटरनेट प्रॉलिफरेशन टेलिव्हिजन

(C) इंटर प्रोव्हिजनल टेलिव्हिजन

(D) इंटरनेट प्रोटोकॉल टेलिव्हिजन

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



37. The world's first computer, ENIAC was developed in the year :

(A) 1945

(B) 1940

(C) 1955

(D) 1960

38. Which communication service has been recently closed in India ?

(A) Postal service

(B) Landline

(C) Telegram

(D) Fax

39. For recruitment as a school teacher in Maharashtra one must enroll himself/herself on the web portal :

(A) Saral

(B) Maha Jobs

(C) e-Seva

(D) Pavitra

37. जगातील पहिला संगणक (एनियाक) या वर्षी विकसित करण्यात आला :

(A) 1945

(B) 1940

(C) 1955

(D) 1960

38. भारतात पुढीलपैकी कोणती संवाद सेवा नुकतीच बंद करण्यात आली ?

(A) टपाल सेवा

(B) दूरध्वनी (लँडलाइन)

(C) तार

(D) फॅक्स

39. महाराष्ट्रात शिक्षक म्हणून नोकरी करू इच्छिणाऱ्यांनी स्वत:ची माहिती पुढीलपैकी कोणत्या संकेतस्थळावर नोंदवणे आवश्यक आहे ?

(A) सरल

(B) महा जॉब्स

(C) ई-सेवा

(D) पवित्र

www.prepp.in

prepp
Your Personal Exams Guide



40. Which statement among the following is *not correct* with respect to National Digital Library of India ?

(A) It is a project by Department of Technology.

(B) It is a virtual repository of learning resources with single window search facility.

(C) It is friendly to differently-abled learners.

(D) It is being developed at Indian Institute of Technology, Kharagpur.

41. Convention on Ozone Depleting Substances is also known as :

(A) Basel Convention

(B) Montreal Protocol

(C) Ramsar Convention

(D) Conference of Parties

42. Unit used to measure noise level is :

(A) Joule

(B) PPM

(C) Bit

(D) dB

40. भारतीय डिजिटल राष्ट्रीय ग्रंथालयासंदर्भात पुढीलपैकी कोणते विधान **योग्य नाही** ?

(A) हा केंद्र सरकारच्या तंत्रज्ञान विभागाचा प्रकल्प आहे.

(B) एक खिडकी शोध सुविधा असलेला हा शैक्षणिक संदर्भसाहित्याचा आभासी साठा आहे.

(C) हे ग्रंथालय दिव्यांग अभ्यासकांना सहजपणे वापरता येते.

(D) या ग्रंथालयाचा विकास भारतीय तंत्रज्ञान संस्था (आय.आय.टी.), खरगपूर येथे करण्यात येत आहे.

41. ओझोन कमी करणाऱ्या पदार्थाविषयीची परिषद .............................. म्हणूनही ओळखली जाते.

(A) बेसेल परिषद

(B) मॉंट्रियल प्रोटोकोल

(C) रामसर परिषद

(D) विविध देशांच्या गटाची परिषद

42. ध्वनी तीव्रतेची पातळी मोजण्यासाठी पुढीलपैकी कोणते एकक वापले जाते ?

(A) Joule

(B) PPM

(C) Bit

(D) dB

prepp Your Personal Exam Guide

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



43. Green India Mission was part of the :

(A) Millennium Development Goals

(B) River Action Plan

(C) Swatch Bharat Abhiyan

(D) National Action Plan for climate change

44. International Solar Alliance was established to develop co-operation in developing solar energy was proposed by :

(A) Indian Prime Minister

(B) French President

(C) African Union

(D) European Union

45. Concentration of toxic chemicals through food-chain result into :

(A) Accumulation

(B) Excretion

(C) Biomagnification

(D) Elimination

46. Technical and scientific education was given in :

(A) Vedic system of education

(B) Pre-Vedic system of education

(C) Buddhist system of education

(D) Islamic system of education

43. हरीत भारत मोहीम हा .............................. चा भाग आहे.

(A) सहस्त्रक विकास उद्दिष्टे

(B) नद्या विकास योजना

(C) स्वच्छ भारत अभियान

(D) वातावरणीय बदलासाठीचा राष्ट्रीय कृती योजना

44. आंतरराष्ट्रीय सौर सहभागित्त्व हे सौर उर्जा सहकार्य विकसनासाठी कोणी प्रस्तावित केले होते ?

(A) भारतीय प्रधानमंत्री

(B) फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष

(C) आफ्रिकन युनियन

(D) युरोपियन युनियन

45. अन्नसाखळीतून निर्माण होणारी विषारी रसायने ............................ याला कारणीभूत होतात.

(A) संचय

(B) उत्सर्जन

(C) जैव विस्तारीकरण

(D) काढून टाकणे

46. तांत्रिक व वैज्ञानिक शिक्षण हे .................. प्रणालीमध्ये दिले जात होते.

(A) वैदिक शिक्षण

(B) पूर्व-वैदिक शिक्षण

(C) बुद्धिस्ट शिक्षण

(D) इस्लामिक शिक्षण

47. According to UGC list published the state with the most universities is :
    (A) Uttar Pradesh
    (B) Maharashtra
    (C) Tamil Nadu
    (D) Rajasthan

48. For creation and development of MOOC courses in different disciplines MHRD has notified .......................... is one of the eight national co-ordinators.
    (A) Mumbai Vidyapeeth
    (B) U.G.C.
    (C) YCMOU
    (D) IIT Mumbai

49. Most of the State Universities are ............................ in nature.
    (A) Affiliating Universities
    (B) Deemed Universities
    (C) Self-financing Universities
    (D) Private Universities

50. Which organization arranges administrative course for principals ?
    (A) HRD Ministry
    (B) UGC
    (C) NUEPA
    (D) NCTE

47. यू.जी.सी.ने प्रसिद्ध केलेल्या यादीनुसार ........ या राज्यात सर्वात जास्त विद्यापीठे आहेत.
    (A) उत्तरप्रदेश
    (B) महाराष्ट्र
    (C) तामिळनाडू
    (D) राजस्थान

48. विविध विद्याशाखेतील MOOC कोर्सेस विकसित करण्यासाठी MHRD ने आठ राष्ट्रीय कोऑर्डिनेटर्सपैकी .................................. ही एक संस्था नामित केलेली आहे.
    (A) मुंबई विद्यापीठ
    (B) विद्यापीठ अनुदान आयोग
    (C) य.च. महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ
    (D) आय.आय.टी. मुंबई

49. बहुतांशी राज्य विद्यापीठे ही ...................... स्वरूपाची विद्यापीठे आहेत.
    (A) संलग्नित
    (B) अभिमत
    (C) स्वयं-अर्थ साहाय्यित
    (D) खाजगी

50. प्राचार्यांसाठी प्रकाशकीय कोर्स कोणते अस्थापना आयोजित करते ?
    (A) मानव संसाधन मंत्रालय
    (B) विद्यापीठ अनुदान आयोग
    (C) राष्ट्रीय शैक्षणिक नियोजन व प्रशासन विद्यापीठ
    (D) राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषद

www.prepp.in



**ROUGH WORK**